# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अलिबाग-रायगड.

## पदभरती जाहिरात.

जाहिरात क्र.३/२०२०, दि.७/१०/२०२०

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने **दि.६ डिसेंबर २०२०** रोजीपर्यंतच्या कालावधी करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | लेखापाल | **B.Com with Tally Certificate** | जिल्हास्तर | रु. १७०००/- | २ | अ.जा.-१, अ.ज.-१, | - |
| २ | सांख्यिकी अन्वेषक | **Graduate in Statistics or Mathematics, MSCIT** | जिल्हा रुग्णालय | रु. १७०००/- | १ | अ.जा.-१ | - |
| ३ | Supervisior (TB - STS) | **Any graduate with typing skill Marathi 30 -words per minute, English 40 words per minute with MSCIT** | तालुकास्तर | रु. २००००/- | ६ | अ.जा.-१, विजाअ -१, भजब - १, SEBC - १ EWS - १ अराखीव - १ | १ वर्ष |
| ४ | Councellor (TBHV) | **MSW** | तालुकास्तर | रु. १७०००/- | १ | अ.जा. - १ | १ वर्ष |

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०६.१२.२०२० पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

Scanned by CamScanner

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सकांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल याशिवाय निवड झालेनंतर संबंधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) अ.क्र.१ ते ४ या कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. सदर बाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प. अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

७) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम देखील कार्यालयास सादर करावा.

९) सदर पदभरती ही कोविड १९ या साथीच्या प्रादुर्भावाच्या काळात होत असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांचे अर्ज हे टपालाव्दारे अथवा समक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाबाहेरील अर्जपेटीमध्ये टाकणेचे आहेत. कोणत्याही उमेदवारांस कोणत्याही पदासाठी सादर केलेल्या अर्जावर पोहोच मिळणार नाही याची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी.

१०) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व रायगड जिल्हा परिषदेच्या zpraigad.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

११) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच मेरिट लिस्ट तयार करताना पात्र उमेदवारांच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण + NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करणेत येईल.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

Scanned by CamScanner

१३) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील.

१४) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, चौथा मजला, रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे दि.८/१०/२०२० ते दि.१६/१०/२०२० रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. दि.१६/१०/२०२० रोजी सायंकाळी ५ नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१५) सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख दि.१६/१० /२०२० ही राहणार असुन तदनंतर अर्जाची छाननी, पात्र /अपात्र यादी, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे, गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे, निवड यादी प्रसिध्द करणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी रायगड जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर zpraigad.maharashtra.gov.in प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही.

१६) उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे - १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ५) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ६) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७) याशिवाय नियुक्ती आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील.

दिनांक :- ७/१०/२०२०

ठिकाण :- अलिबाग

सदस्य
निवड समिती
तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

डॉ.किरण पाटील, (भा.प्र.से.)
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

Scanned by CamScanner